सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## विभागीय शिक्षण उपसंचालक मुंबई यांचे कार्यालय

नेताजी सुभाष रोड, जवाहर बालभवन, चर्नी रोड ( प ) मुंबई -४०० ००४
दुरध्वनी क्रमांक- ०२२-२३६३००८१/८६ ईमेल- dydemumbai@yahoo.com

क्र.शिउसं/समन्वय-१/संकीर्ण/२०२४/ 7107 दिनांक :- 31 JUL 2024

प्रति,

१. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका
२. शिक्षण निरीक्षक,
बृहन्मुंबई, उत्तर / दक्षिण / पश्चिम विभाग
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक),
जिल्हा परिषद, ठाणे / पालघर / रायगड

**विषय :- राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये "मित्र उपक्रम" कार्यान्वित करणेबाबत..**

**संदर्भ :-** १. विपश्यना रिसर्च इन्स्टिटयुट,धम्म गिरी,इगतपुरी यांचे दि.३१.७.२०२४ रोजीचे पत्र
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे परिपत्रक क्रमांक-संकीर्ण २०११(२९६/११)/ माशि-३, दि.२७.०१.२०१२

उपरोक्त विषयानुसार राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये अनापना साधना वर्ग सुरु करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी शासन परिपत्रक दि.०५.१०.२०११ अन्वये आदेश निर्गमित केले होते. सदरचा कार्यक्रम राज्यातील सर्व इ.५ वी ते १० वीपर्यंत शिकणा-या विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौध्दिक वाढीकरिता उपकारक ठरणार असल्याने त्यास संदर्भ क्र.२ वरील शासन परिपत्राकान्वये विहित केलेल्या अनापना साधना वर्गास "मित्र उपक्रम" (Mind In Training For Right Awareness) या नावाने संबोधण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. आनापान साधनेच्या दैनंदिन सरावामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, स्मरणशक्ती, निर्णयक्षमता विकसित होऊन अध्ययन क्षमता वृध्दिंगत होईल, या हेतूने या उपक्रमाची अंमलबजावणी सर्व शाळांमध्ये करण्याबाबत विपश्यना रिसर्च इन्स्टिटयुट, धम्म गिरी, इगतपुरी यांनी संदर्भिय पत्रान्वये विनंती केलेली आहे.

तरी संदर्भिय पत्रानूसार "मित्र उपक्रम" राबविण्याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील अधिनस्त शाळांना अवगत करावे.

**सोबत :-** संदर्भिय पत्र.

( संदीप संगवे )
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई.

**प्रत :-**

व्यवस्थापक, विपश्यना रिसर्च इन्स्टिटयुट, धम्म गिरी, इगतपुरी (मित्र उपक्रम)
१ ला मजला, मनपा शाळा, जगनाथ भटकर मार्ग, परेल, मुंबई-१२

E:\S-1 समन्वय\संकीर्ण.docx